# कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, हणेगाव.
# ता. देगलूर. जि. नांदेड.
# विभाग - मराठी

**वर्ग : बी. ए. द्वितीय वर्ष. निवडक कादंबरी वाङ्मय पेपर VII वा**

प्रा. कांबळे एस.एस.

**कादंबरीचे स्वरूप :-**

संवेदनशील मनाचा सृजनशील साहित्यिक त्या त्या काळाच्या सभोवती घडणाऱ्या घटना-प्रसंगांचा साक्षीदार असतो. तसेच एकूण सामाजिक स्थिती, गती अधोगती, उत्क्रांती इत्यादींचा तो साक्षीदार असतो. प्रत्यक्ष अनुभव घेणे आणि ते साहित्यातून नोंदवणे अशी कामे लेखक करतात. मराठी कादंबरी वाङ्मयाचे अवलोकन केल्यानंतर वरील विधानाचा प्रत्यय साक्षात होतो. मराठी कादंबरी साहित्यप्रकारांच्या आकृति बंधाचे निकष अनेक होते. तिच्या स्वरूपाविषयी सार्थ आणि परिपूर्ण व्याख्या करणे कठीण होते. कादंबरीच्या उगम काळात 'कादंबरी' चा आलेख कसा निर्माण झाला? याचा वेध घेणे येथे अपेक्षित आहे. माणसाला माणू सपणाची जाणीव निर्माण झाली, तेव्हापासून नवनिर्माण साकार होऊ लागले, मानवी व्यक्तिमत्त्वाचे आणि बौद्धिकतेचे नवनिर्माणशीलता हे महत्त्वपूर्ण लक्षण आहे.

**'कादंबरी' शब्दाचा कोशगत अर्थ :** १. कल्पित कथा, कहानी, २. सुंदर, मनोरंजक, अद्भूत व रसमय अशी गोष्ट, ३. बाणभट्टाने रचलेल्या एका ग्रंथाचा विषय असलेली कादंबरी (आदर्श मराठी शब्दकोश प्र. न. जोशी, आवृत्ती सातवी, २००७, पृ. १५३) भारतात सातव्या शतकात होऊन गेलेल्या बाणभट्ट नामक कवीने लिहिलेल्या 'कादंबरी' या ग्रंथनामावरून 'कादंबरी' हा एक शब्द मराठीत आला. साहित्यप्रकार म्हणून रूढ झाला. तो ग्रंथ म्हणजे दीर्घ कथारूप असून साहित्यविश्वातील पहिली कादंबरी होय. इंग्रजीतील 'टेन्स ऑफ गंजी' ही पहिली कादंबरी अकराव्या शतकात लिहिली. विकिपिडियामध्ये 'साधारणतः अधिक लांबीचा काल्पनिक कथा असलेल्या गद्य लेखनास 'कादंबरी' संबोधले आहे. कादंबरीला आज एक मुख्य वाङ्मयप्रकार म्हणून जागतिक मान्यता आणि लोकप्रियता लाभलेली आहे. परंतु कादंबरीचा उगम आणि विकास सुरुवातीच्या काळात पाश्चात्य राष्ट्रांमध्ये झाला. त्याच राष्ट्रांमध्ये नाटक आणि कविता या वाङ्मयप्रकारांप्रमाणे कादंबरी लेखनाची शतकानुशतकाची दीर्घ परंपरा नाही. कादंबरीचे रूप वास्तवामध्ये अठराव्या शतकातच उत्क्रांत झाले आणि साहित्यविश्वामध्ये एक प्रधान वाङ्मयप्रकार म्हणून कादंबरीस एकोणिसाव्या शतकापूर्वी मान्यता मिळाली.

**कादंबरी साहित्यप्रकाराचा उदय :**

मार्क्सवादी टीकाकारांच्या मते, 'कादंबरी हे भांडवलशाही समाजरचनेचे आपत्य आहे', हे मत निर्विवादपणे स्वीकार्य नसले तरी मानवी समाज स्थिरावल्यानंतर त्यांचा सांस्कृतिक प्रगतीचा एक भाग म्हणून इतर कला आणि साहित्य प्रकाराबरोबर कादंबरीचा जन्म झाला हे नाकारता येणार नाही.

. अर्वाचीन काळात कादंबरीचा उगम अठराव्या शतकात युरोपात झाला. युरोपातील आरंभकालीन कादंबरीकारांची पूर्व माहिती देताना‘ केतकरी कादंबरी नाइ  या ग्रंथात श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'जपानमध्ये बाराव्या शतकात आणि चीनमध्ये पंधराव्या शतकात कादंबरी अस्तित्वात होती.' हे डायना स्सिमनचे विधान उद्धृत करून पुढे म्हटले आहे, की 'डायना स्पिअर्समन हीस माणाच्च्या कादंबरीची माहिती असती तर तिने या विधानात थोडा बदल केला असता.' म्हणजेच बाणाची कादंबरी इसवी सनाच्या सातव्या शतकात लिहिल्यामुळे कादंबरी या शीर्षकामधून साहित्य सर्वप्रथम भारतात निर्माण झाले असल्याचे दुर्गा भागवत यांचे म्हणणे लक्षात घ्यावेलागते. कादंबरीच्या मूळ स्वरूपाचा आणि उगमाचा प्रश्न देशोदेशीच्या प्राचीन कथानक परंपरांकडे घेऊन जातो, हा भालचंद्र नेमाडे यांचा विचार चिंतनीय आहे. कादंबरीत समाविष्ट असलेल्या घटकांची बीजे प्राचीन काळातील देशोदेशीच्या कादंबरी सादृश्य लेखनात सापडत असली तरी एक साहित्यप्रकार म्हणून कादंबरीने धारण केलेला रूपबंध ही बाब अर्वाचीन आहे. यासंदर्भात मीनाक्षी मुखर्जी यांचे विधान मोलाचे वाटते. त्या म्हणतात, 'युरोपमध्ये कादंबरी वाङ्मयप्रकाराने स्वतंत्र व्यक्तिमत्त्व धारण केले. तेव्हा १९ व्या शतकाच्या आधीपासून त्याचा घाट अस्तित्वात असणाऱ्या महाकाव्य, अद्भूतकथा व वीरकथा या कथन प्रकारांच्या रचनापेक्षा निश्चितपणे भिन्न होता.' एकूणच अर्वाचीन कादंबरी ही युरोपात उगम पावली असे म्हणत असले तरी त्याची पाळेमुळे देशोदेशीच्या विविध मुलुखामध्ये सापडतात.

**कादंबरी व्याख्या व स्वरूप :-** पाश्चात्त्य देशांमध्ये या वाङ्मयप्रकाराचे दोन प्रकारे लेखन केले जात असे. एक महाकाव्याआधारे व दुसरे इतिहासाआधारे. महाकाव्याआधारे लिहिलेल्या कादंबऱ्या अद्भुत प्रकारच्या असत. त्यांना रोमान्स असे म्हटले जात असे. इतिहास डोळयासमोर ठेवून चित्रण करणाऱ्या किंवा इतिहासाआधारे लिहिल्या जाणाऱ्या कादंबरीला नोवेल असे म्हटले जाई. भारतामध्ये रोमान्स +नोवेल या दोन्हींचे मिश्रण करून कादंबरी निर्माण झाल्याचे पाहावयास मिळते. मराठीमधील लेखकांच्या मनात प्रणयरम्य व बोधकथा हे एक कादंबरीचे स्वरूप दिसते, असे कादंबरी या शब्द योजनेबद्दल म्हणता येते. मराठी कादंबरीला दिले गेलेले 'कादंबरी' हे सामान्यनाम संस्कृत परंपरेचा निर्देश करते, परंतु तो संबंध भाग बराचसा नाममात्र समजावा लागेल. एकोणिसाव्या शतकातील मराठी कादंबरी इंग्रजी फॉर्मच्या संसर्ग आणि प्रभावातून आणि संस्कृतच्या संस्कारातून आकारास आली, असे स्पष्ट आहे. मीनाक्षी मुखर्जी यांनी भारतीय कायांच्या उदयाचा विचार मांडताना, या साहित्यप्रकाराच्या बाढीस कारणीभूत असलेले घटक व वसाहती देशातील कथन परंपरामधून निर्माण झाले होते, हे नमूद केले आहे. कादंबरीच्या विकासात इंग्रजी शिक्षण आणि त्या शिक्षणातून पाक्षात्य साहित्य परंपरेचे झालेले दर्शन हे दोन घटक अत्यंत प्रभावी होते. एक खरे आहे. म्हणजेच मराठी कादंबरीने इंग्रजीचा प्रभाव आणि संस्कृतचा संस्कार स्वीकारला आहे. पण मराठी साहित्याची प्राचीन मराठी साहित्य अशी कुठलीच सांधेजोड राहिली नाही. आधुनिक काळात महाकाव्याची जागा कादंबरीने घेतली.

विविधांगी समाजवास्तव सामावून घेणारा कथात्मक साहित्यप्रकार, असे त्याचे वर्णन करता येते. पण या दृष्टीने तो समकालीन समाज वास्तवाचा भाग बनून दस्तऐवज ठरतो. आजच्या काळात लिहिली जाणारी ऐतिहासिक कादंबरीसुद्धा भूतकालीन सामाजिक वास्तव शब्दरूपात साकार करण्याचा प्रयत्न करते. अर्थात या प्रयत्नातून वर्तमानावरही नवा प्रकाश पडत आहे. कादंबरी हा सर्वसमावेशक व परिपूर्ण साहित्यप्रकार आहे. मानवी जीवनदर्शन घडविणे हा तिच्या निर्मितीमागील प्रधान हेतू आहे, असे विशालतत्व व व्यापकत्व असणाऱ्या कादंबरीची कोणत्याही कलाप्रकाराप्रमाणे सर्वमान्य व वस्तुनिष्ठ व्याख्या करता येत नाही. कादंबरी या शब्दांमधून गद्य साहित्याप्रकार व्यक्त होत असल्याने संकल्पना तयार करण्यात अडचण येते. म्हणून कादंबरीच्या व्याख्या व स्वरूपाविषयी संक्षिप्त माहितीवजा स्वरूपवेध पुढीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

**भालचंद्र नेमाडे म्हणतात**, 'कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली आशयसूत्रांचे अनेक पवर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग, अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेले आहेत अशी साहित्यकृती असते. कादंबरीत या सर्व गोष्टींमुळे एखादी मोठी कृती साकल्याने मांडता येते. सामाजिक वास्तव व आशय विशाल असावा लागतो..... एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासह मांडलेला असतो. एखाद्या संस्कृतीचे तपशीलासह दर्शन घडविलेले दिसते. संपूर्ण कालखंडांचा किंवा समाजाचा वेध घेतलेला असतो, असे सूत्र बळकट व पात्रे सलग उभी असतात.

**अरनॉल्ड बेनेट** यांच्यामते, "स्वतःचे विचार, भावना दुसऱ्यास कळविण्याकरिता कथा माध्यमांचा आश्रय घेणारा वाङ्मयप्रकार म्हणजे कादंबरी".

**मनोविश्लेषक -** "हृदयतरंगाचे आविष्करण अथवा मानवी हृदयाचा सूक्ष्म अभ्यास म्हणजे कादंबरी."

**फीलि्डंग** - "गंभीर वातावरण नसलेले महाकाव्य म्हणजे कादंबरी होय. " एच. जी. वेल्स "ज्यात सर्वकाही सामावेल अशी गारुड्याची थैली म्हणजे कादंबरी. सत्यसृष्टीच्या आधारे काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तदलंबित जीवितघटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून कलानंदाची प्राप्ती करून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग म्हणजे कादंबरी."

**मुंशी प्रेमचंद** - "मै उपन्यास को मानव चरित्र का चित्रमात्र समजता हूँ। मानव चरित्रपर प्रकाश डालना और उसके रहस्य मे खोजना उपन्यास का मूलतत्त्व है।“

**कुसुमावती देशपांडे -** "ज्या कथेमध्ये केवळ मुख्य व्यक्तीशी लेखकाचे तादात्म्य झालेले असते, मुख्य व्यक्तीच्या दृष्टीने लेखकाने जगाकडे, तिच्या संबंधितांकडे पाहिलेले असते, त्या कथेत विशेष एकसूत्रता येते, ती बांधीव होते, तिच्यात परिणामता उत्कटता येते, तिला कादंबरी म्हणतात."

**वि. का. राजवाडे -**"कादंबरी म्हणजे समाजाचा एक असा दस्तऐवज - आहे, की त्याच्यामध्ये मानवाचे आणि मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते. संबंध जीवनाला हा प्रकार कवेत घेतो,"कॅथरीन लिव्हर म्हणतात,

"कथात्म लिखित गद्याच्या बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा लेखकाने निर्मिले ला नव्या आणि कल्पित वास्तवातला वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध म्हणजे कादंबरी. साधारणता पन्नास हजारांहून अधिक शब्द असलेल्या कल्पित गोष्टीला कादंबरी म्हणता येते."

कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा निराळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असून त्याचे स्वरूप विशेष खालीलप्रमाणे नोंदविता येतात. कादंबरीमध्ये कथात्मक गद्याचे विस्तृत रूप आढळते. कादंबरीत घटना आणि काळाचा विशालपट असतो. कादंबरी वाङ्मयात कथानकाला विशेष महत्त्व असते. मानवी जीवन व्यवहाराचे व्यापकदर्शन कादंबरीत घडते, कादंब वाङ्मयप्रकार नवतेची जाणीव घेऊन येतो, घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रण, वातावरण इत्यादी घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाचे व्यामिश्र दर्शन कादंबरीत घडते. वास्तव आणि कल्पित यांचा समन्वय म्हणजे कादंबरी आशय आणि विषयाची गतिमा नता कादंब रीतील घटना-प्रसंगांच्या गतिमानतेचे स्वरूप दर्शविते, सामाजिक वास्तवामुळे कादंबरी अनेककेंद्री बनते. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा कार्यकारणभाव कादंबरीत असतो.

कादंबरी हा निर्मिती काळाचा, जीवन आणि कलांचा सुमेळ साधणारा वाङ्मयप्रकार आहे. कादंबरी विस्तृत भाषिक अवकाश असलेला साहित्यप्रकार असल्याने तिच्यातील घटकांचा आवाकाही मोठा असतो. बदलत्या काळानुसार कादंबरीच्या स्वरूप व प्रयोजनात बदल झाले आहेत. म्हणजेच कादंबरीला काल परिमाण अपरिहार्यपणे अनुसरावे लागते. कादंबरी हा समाज वास्तवाशी एकनिष्ठ साहित्यप्रकार आहे, असे कादंबरीचे स्वरूप विशेष नोंदविता येतात.

**कादंबरीचे घटक :** कोणताही वाङ्मयप्रकार अर्थात कादंबरीसुद्धा स्वयंभू असू शकत नाही. विशिष्ट घटकांच्या सहाय्याने कादंबरीची निर्मिती होते. म्हणजेच कादंबरी वाङ्मयप्रकाराचे विविध घटक आढळतात. त्यांचा मा गोव पुढीलप्रमाणे घेता येतो.

**कथानक :** एखादे चित्र शिल्पाकृती आपल्या नजरेसमोर येते. तिथे आकलन एकदम होते. परंतु कादंबरी ही कलाकृती असल्याने तिचे आकलन एकदम होत नाही. कादंबरीचे वाचन ही एक लेखनाबद्दल प्रति क्रिया असते. कादंबरीतील कृती कोणत्या स्थळ-काळाच्या अवकाशात घडत आहेत, कादंबरीतील पात्रे काय करीत आहेत, हे कादंबरीकार दर्शवित असतो. या साऱ्यांची वीण घट्ट करून 'कथानक' विकसित केले जाते. कथानक म्हणजे कादंबरीकाराने वाचकांसमोर ठेवलेली प्रसंगांची व्यतींच्या कृतींची आणि घटनांची जुळणी होय. ती जुळणी कशी करायची ते कादंबरीकारावर अवलंबून असते. अभ्यासकांनी कथानक आणि गोष्ट यामध्ये भेद सांगितला. राज मेल्यानंतर राणी मेली' ही गोष्ट होय. 'राजा मेल्यानंतर त्याच्या दुःख वियोगाने राणी मरण पावली' हे एक कथानक होय. कथानकाची गती कायम ठेवून वाचकांच्या मनात सतत उत्कंठा निर्माण व्हावी आणि कथानक पुढे सरकत जावे, त्याप्रमाणे कथानक घटनांच्या आधारे पुढे सरकत जात असते.

अशा घटना पात्रांकडून घडत असतात. आरंभ, मध्य आणि शेवट या तीन गोष्टींचे भान कादंबरीकार ठेवत असतो. चित्तवेधक आरंभ करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती कादंबरीमध्ये आढळतात. कथानक ही एक संरचना आहे. या संरचनेसाठी लेखक घटना प्रसंगांची निवड करतो. अशा कथानकाचे मुख्य दोन प्रकार पडतात. एक म्हणजे अनुलोम पद्धत. म्हणजेच कालानुक्रमे घटनांचे निवेदन करीत जाणे. तसेच दुसऱ्या विलोम पद्धतीने कथानकाचा प्रारंभ एखाद्या महत्त्वाच्या घटनेपासून करून नंतर जुन्या घटनांचे निवेदन केले जाते. या कथानकाच्या प्रकारातून कादंबरीचे पट साकारत जातात. पात्रे कादंबरी वाचताना समजतात ती पात्रे. कादंबरी वाचताना वाचकांना व्यक्तिचित्रणामुळे पात्रांचा परिचय होतो. ती पात्रे कशी वर्तन करतील, याचा अंदाज वाचक बांधतात. कादंबरीतील पात्रे ही कादंबरीकारांची निर्मिती असते. त्यामागे कादंबरी काराचा हेतू असतो. त्यामुळे काही पात्रे विशेष महत्त्वाची प्रधानपात्रे तर काही अजिबात निरुपयोगी गौण पात्रे असतात. ज्या कादंबरीत कथानक महत्त्वाचे असते. तिथे कथानकाच्या पूर्ततेसाठी पात्रांचे चित्रण येते, तर काही कादंबऱ्या व्यक्तीभोवती गुंफलेल्या असतात. व्यक्तिचित्रणावर भर देतात. कादंबरीत आणि व्याव हारिक जीवनात बराच फरक पडतो. एम. फॉस्टर यांनी पात्रांचे वर्गीकरण दोन प्रकारात केले आहे. एक-स्थिरपात्रे ही कोणत्याही एखाद्या कल्पनेभोवती रचलेली असतात. त्यांच्यात परिस्थितीनुसार कसला ही बदल घडून येत नाही. याची वैशिष्ट्ये एका वाक्यात सांगता येतात. वाचकांना ती पात्रे ताबडतोब ओळखता येतात. विनोदी भूमिका वटविण्यासाठी विशिष्ट स्वभावधर्माची स्थिरपात्रे उपयोगी पडतात. त्यात गंभीर भूमिका करणारे स्थिरपात्र असू शकतात.

दोन-विकसनशील पात्रे परिस्थितीनुसार बदलत असतात. ही पात्रे गुंतागुंतीची असतात, त्यामुळे मानवी स्वभावावर प्रकाश पडतो. उदाहरणात 'सुशीलेचा देव' मधील 'सुशीला'. काही ठरावीक नमुने, नायक-नायिका, खलनायक समजूतदार इत्यादी. एकंदरीत कादंबरी ही स्थिर व विकसनशील पात्रातून साकारते. स्वभाव रेखाटन-लेखकाने कादंबरीत योजलेली पात्रे समाजातील विविध वृत्ती-प्रवृत्ती, वासना विकृती आणि भावना-विचार, कृती-स्वभावांचे निदर्शक असतात. कादंबरीतील घटनाप्रसंग व आशय-विषयाला अनुरूप पात्रांच्या स्वभावाचे रेखाटन केलेले असते. अशा स्वभावाद्वारे मानवी स्वभावांचे दिग्दर्शन घडते

**मनोः विश्लेषण** - वाचकांना आकृष्ट करण्याकरिता आणि कलाकृती वाचताना खिळवून ठेवण्याकरिता कादंबरीकार मनोविश्लेषणाचे रचनातंत्र योजतो. वाचन अभिरुचीपूरक भाषाशैली, घटनाप्रसंगांची गुंफण, रसिकांची जिज्ञासा बविणारे वर्णन एखादा प्रसंग रेखाटताना आगामी मजकूर आणि घटना- प्रसंग चित्रणातील अंदाज आडाखे मनोविश्लेषणात्मक पातळीवर घडावेत, असा आकृतिबंध लेखकाने वापरलेला असतो. यातूनच मनोः विश्लेषणात्मक कादंबरी निर्माण झालेली दिसते

**वातावरण** - वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय घटक. कादंबरीतील कोणतीही व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाही, तर त्यांची मुळे कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने कादंबरीमध्ये निर्माण केलेल्या वातावरणात रुजलेली असतात. म्हणजेच कादंबरीतील पात्रे कुठेतरी वावरत असतात. त्यांच्याभोवती विविध वस्तूंनी भरलेले जग असते, त्यालाच वातावरण म्हणतात. कादंबरीला असणारी स्थळ-काळाची चौकट, भौगोलिक- सांस्कृतिक परिसर, पात्रे, घर, रस्ते हा सारा वातावरणाचा भाग समजला जातो. कादंबरीचा फलक विस्तृत असल्यामुळे व्यक्तीच्या सभोवतालचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक तो सगळा बारीकसारीक तपशील कादंबरीकार पुरवू शकतो.

कादंबरीतील पात्रांच्या वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य वातवरणामध्ये असते. वातावरण हा एकूणच पात्रचित्रणाचा परिणाम होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा घटक असतो. कादंबरीमध्ये वातावरणनिर्मिती दोन प्रकारे केली जाते. एक म्हणजे प्राकृतिक वातावरण, म्हणजे निसर्गाने निर्माण केलेले नैसर्गिक वातावरण. अशा प्रकारचे वातावरण प्रादेशिक कादंबरीत आलेले दिसते. तसेच दुसऱ्या प्रकारात मानवनिर्मित वातावरण. म्हणजेच लेखकाने कल्पनेच्या आधारे निर्माण केलेले वातावरण असते. अशा प्रकारे दोन्ही प्रकारचे कादंबरीतील वातावरण लेखकच निर्माण करीत असतो. वातावरणनिर्मिती कादंबरीतील पात्रावर प्रभाव टाकत असते. एखाद्या कादंबरीतील घराचे वर्णन व्यक्तीच्या स्वभावावर प्रकाश टाकते. उदाहरणार्थ- जयंत दळवी यांच्या 'अंधाराच्या पारंब्या मधील घराचे वर्णन वातावरणाचा व पात्रांच्या स्वभावाचा निकटचा संबंध दर्शविते. त्यामुळे पात्रचित्रणाचा वातावरण चित्रण हा एक भाग आहे. 'गारंबीचा बापू मधील 'गारंबी', 'बनगरवाडी'मधील 'बनगरवाडी', 'चक्र'मधील 'झोपडपट्टी' यांच्यातील वातावरण चित्रणाचा कलात्मकतेशी निकटवर्ती संबंध आहेच.

**घटनाप्रसंग-** कादंबरीचा विषय हा प्रामुख्याने घटनाप्रधान असतो. कादंबरीमध्ये अनेक घटना आलेल्या असतात. कादंबरीमध्ये लेखक केवळ घटना आणायच्या म्हणून आणत नसतो, तर या घटनांना कार्यकारणभाव असतो. कार्यकारणभावामुळे कादंबरीतील निवेदनात आणि गतिमानता प्राप्त होते.

ज्या कादंबरीचे स्वरूप घटनाप्रधान असते, त्या कादंबरीमध्ये जीवनव्यवहाराची सूक्ष्मचित्रणे आलेली दिसतात. घटना-प्रसंगाच्या चित्रणामुळे कादंबरीचा पट हा व्यापक बनलेला दिसतो.

**निवेदन** - कादंबरीचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजेच निवेदनतंत्र होय. येथे कोणीतरी निवेदन करीत असते. कुणाच्यातरी दृष्टीतून घडलेल्या घटनांचे पात्रांचे त्यांच्या कृतीचे, पात्रांच्या स्वभावाचे चित्रण केले जाते. त्यांच्याविषयी कथन केले जाते. निवेदन म्हणजे घटनांची मालिका होय. निवेदनात सातत्यसूत्र असावे लागते. पण घटना म्हणजे कालानुक्रम नव्हे, तर क्रम म्हणजे तार्किक बांधणीहोय.कार्यकारण भावाने जोडलेली घटनांची साखळी नेहमीच्या जीवनाचा कालानुक्रम असते. पण तार्किक सूत्र नसते. कादंबरी आत्मचरित्र यात फरक पडतो तो यामुळेच. कादंबरीत काही ठिकाणी कथन असते. म्हणून कादंबरी नाटकासारखी दिसत नाही, तर आवश्यक तेथे घटनेपेक्षा चित्रणाला महत्त्व असते. कादंबरीच्या निवेदनात पुढील प्रकार दिसतात. एक-प्रथमपुरुषी निवेदन- कादंबरीत एक मुख्य पात्र कथन करीत असते. येथे स्वतः च्या मनातील भावना व्यक्त करायला संधी असते. उदाहरणार्थ फेसाटी', 'कोसला', 'धूळपेरणी' इत्यादी तसेच तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीत निवेदक हा सर्व घटनांचा साक्षीदार असतो. सर्व पात्रांच्या स्वभावांचे ज्ञान त्याला असते. तो पात्रांच्या मनात प्रवेश करून विचार मांडू शकतो. मानवी मनातील गुंतागुंत व आर्तता यात प्रकट झालेली दिसते.

**भाषा आणि शैली** - भाषा आणि शैली यावर कादंबरीची परिणामकारकता असते कादंबरीत निवेदनाची भाषा वेगळी वादाची भाषा वेगळीअसते. कादंबरी हा वास्तवोन्मुख साहित्यप्रकार असल्याने पात्रांच्या तोंडी भाषा जास्तीत जास्त व्यवहारदर्शी, व्यवहाराच्या निकटवर्ती असावी, असे मानतात. कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रकारात भाषिक भिन्नता असतेच. उदाहरणार्थ ऐतिहासिक कादंबरीचे निवेदन आजच्या भाषेत चालत नाही. कादंबरी ही एका लेखकाची निर्मिती व कलाकृती असते. कादंबरी विषयाच्या विश्वाप्रमाणे तिची भाषा असावी, अशी अपेक्षा असते. कादंबरीतील भाषा ही आशयानुसार बदलते. भाषेवर व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होतो. व्यक्तिमत्त्वाच्या भूमिकेप्रमाणेच वाङ्मयविषयक भूमिकेचाही भाषिक शैलीवर प्रभाव पडतो. त्यामुळे एका लेखकाच्या विविध कृतीतून त्याची विशिष्ट शैली आपल्या लक्षात येते. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, पु. भा. भावे, कमल देसाई, भालचंद्र नेमाडे, शेषराव मोहिते यांची विभिन्न अशी लेखनशैली कादंबरीविश्वात निर्माण झालेली दिसते.अशा प्रकारे कादंबरी या प्रकारांचे विशिष्ट असे महत्त्वपूर्ण घटक दिसतात. या घटकातून कादंबरीचा पट उलगडत असतो. कादंबरीची निर्मिती व विकास होत असतो.

******* **समाप्त** *******

# धन्यावाद !

